७१२७-६४

आरोग्य सेवा

जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/अपघात नों/ /९९
राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक
आकडेवारी केंद्र, विश्रांतवाडी पोलीस
स्टेशन समोर, येरवडा, पुणे-४११ ००६

दिनांक : ५ जून, १९९९.

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु,
जिल्हा परिषद, [सर्व]

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद ... 17 JUN 1999

विषय :- अपघात व नैसर्गिक आपत्तीमूळे होणा-या मृत्युची त्वरीत नोंद करुन प्रमाणपत्र देणे बाबत.

संदर्भ :- न्युज लेटर ऑन सी.आर.एस. नवी दिल्ली, दिनांक एप्रिल, १९९९. ....

भारत सरकारच्या मार्गदर्शनानुसार व जन्म-मृत्यु नोंदणी कायदा, १९६९ मधील तरतूदीचें बंधन लक्षांत घेऊन जनतेच्या हिताच्या दृष्टिने अधिक वेगाने कार्य करणे हे आपले आ... कर्तव्य आहे. ब-याचवेळा असे लक्षांत येते की, लग्नाचे व-हाड, जास्त प्रमाणात बसलेल्या वाहनास, तसेच नैसर्गिक आपत्तीमूळे जास्त प्रमाणात ज्यामूळे मृत्यु होतात, त्यावेळी त्यांचे नातेवाईकांना मृत्यु प्रमाणपत्र मिळण्यासाठी बराच त्रास होतो. लोकांना मृत्यु प्रमाणपत्र त्वरीत मिळण्याच्या दृष्टिने संबंधीत कार्यक्षेत्राच्या निबंधकाने त्वरीत नोंदणी करुन घेण्यासाठी खास व्यवस्था करुन अथवा ज्या ठिकाणी मृत्यु झाला आहे, त्या ठिकाणी स्वत: जाऊन नोंदणी करण्याची व्यवस्था करुन मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना मृत्यु प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था केल्यास त्यांना होणारा त्रास टळू शकेल, हे कार्य जितक्या अधिक गतीने व सुस्थितीत करता येईल, तेवढा जनतेचा प्रतिसाद या कार्यास मिळण्यास मदत होऊ शकेल. याकरिता संबंधीत कार्यक्षेत्राच्या पोलीस अधिका-यांनी देखील निबंधकास ही माहिती विहित नमुन्यात भरुन देण्याची व्यवस्था केल्यास निबंधक नोंदणी करुन घेऊन संबंधीतांना प्रमाणपत्र त्वरीत देऊ शकेल. जन्म मृत्यु निबंधक ..., व पोलीस खात्यातील चौकशी अधिकारी यांचा कार्यात सहकार व समन्वय अधिक बळकट होणे गरजेचे आहे. आपण आपल्या जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी महानगरपालिका व नगरपालिकेचे अधिकारी व पोलीस अधिकारी यांच्या दृष्टिस ही बाब आणून देऊन या कार्यास तत्परतेने व यशस्वी कार्यकरण्यासाठी विनंती करावी.

३२७
२१/६/९९

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु,
महाराष्ट्र राज्य, पुणे-६

प्रत - उपसंचालक आरोग्य सेवा मंडळ [सर्व]

शादिच/५६९९